# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

### सहविचार सभा

प्रभात पुणे, गुरुवार, दि. १० सप्टेंबर २०१५

# शासकीय कर्मचाऱ्यांनी दुष्काळनिधीस मदत करावी

## देवेंद्र बुट्टे पाटील यांचे आवाहन : राजगुरुनगर येथे मुख्याध्यापकांची सहविचार सभा

**राजगुरुनगर, दि. ९ (प्रतिनिधी)** - सध्या पाण्याची स्थिती गंभीर असून महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट आहे, अशा स्थितीत शासकीय कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री सहायता निधीला मदत करून आपले सामाजिक दायित्व निभावण्याची गरज आहे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे विभाग व हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मुख्याध्यापक, प्राचार्य सहविचार सभेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या वेळी पुणे विभागीय मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुनील मगर, सहायक सचिव सोनवणे, सहसचिव मधुकर नाईक, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, सचिव ॲड. राम कांडगे, पुणे जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेचे अध्यक्ष प्रा. पांडुरंग होले, संजय बोरकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. बी. शिंदे आदी मान्यवरांसह खेड, आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील सर्व मुख्याध्यापक व प्राचार्य उपस्थित होते.

बुट्टे पाटील म्हणाले की, या सहविचार सभेच्या निमित्ताने आपण शासकीय मदतीबरोबरच विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पाणी बचतीचे महत्व समाजाला पटवून द्यायला हवे. त्याचप्रमाणे सध्या शासकीय पातळीवर शिक्षकांच्या रिक्त जागांचा प्रश्न अनुत्तरित असून शिक्षण मंडळाने प्राध्यापकांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करायला हवा. त्यासाठी प्रशासन व शिक्षक संघटनांनी एकत्रित काम करण्याची गरज आहे. पुणे विभागीय मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुनील मगर यांनी मंडळाची भूमिका सांगताना अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीत शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असून शिक्षण मंडळ व मुख्याध्यापक यांना काम करताना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी या सभेचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले.

या एकदिवसीय सहविचार सभेत इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेचे आयोजन, केंद्र संचालन, अंतर्गत मूल्यमापन, अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तक निर्मिती, शिक्षक प्रशिक्षण, विषय, तुकडी व शाखा मान्यता, सर्व्हिस बुक व पगारपत्रक आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले. स्वागतगीत कोमल वाळुंज हिने सादर केले. सूत्रसंचालन प्रा. जी. जी. गायकवाड यांनी तर उपप्राचार्य प्रा. जी. बी. शिंदे यांनी आभार मानले.




राजगुरुनगर : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे विभाग व हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मुख्याध्यापक, प्राचार्य सहविचार सभेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना देवेंद्र बुट्टे पाटील.

लोकमत पुणे, रविवार, दि. १३ सप्टेंबर २०१५ ३

# दुष्काळात पाण्याचे नियोजन आवश्यक

## देवेंद्र बुट्टे पाटील : सहविचार सभा

राजगुरुनगर : ''पाण्याची स्थिती गंभीर आहे. यामुळे पाण्याचे नियोजन होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट आहे, अशा परिस्थितीत शासकीय कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री सहायता निधीला मदत करुन आपले सामाजिक दायित्व निभावण्याची गरज आहे,'' असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे विभाग व हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मुख्याध्यापक आणि प्राचार्य सहविचार सभेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी पुणे विभागीय मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुनील मगर, सहायक सचिव सोनवणे, सहसचिव मधुकर नाईक, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, सचिव ॲड. राम कांडगे, पुणे जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेचे अध्यक्ष प्रा. पांडुरंग होले, संजय बोरकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. बी. शिंदे आदी मान्यवरांसह खेड, आंबेगाव व जुन्नर तालुक्यांतील सर्व मुख्याध्यापक व प्राचार्य उपस्थित होते.



सभेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना देवेंद्र बुट्टे पाटील.

बुट्टे पाटील म्हणाले, ''या सहविचार सभेच्या निमित्ताने आपण शासकीय मदतीबरोबरच विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पाणीबचतीचे महत्त्व समाजाला पटवून द्यायला हवे. त्याचप्रमाणे सध्या शासकीय पातळीवर शिक्षकांच्या रिक्त जागांचा प्रश्न अनुत्तरित असून, शिक्षण मंडळाने प्राध्यापकांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करायला हवा. त्यासाठी प्रशासन व शिक्षक संघटनांनी एकत्रित काम करण्याची गरज आहे.''

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख